REGISTERED No. B. 3134




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १० मार्च १९४८ अंक ९


विजय

टेक्सटाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.

मॅनेजिंग एजंट्स्.

गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश —
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

दि सुप्रीम म्यूच्युअल
विमा कंपनी लि. पुणें २.

| | | | रुपये |
|---|---|---|---|
| आलेलें काम | : | : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : | : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : | : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठी व विम्यासाठी चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

कार्ड पाठवून व्ही. पी. नें मागवा **आंबावडी** रक्तवर्धक खुराक — फडके प्रॉडक्टस् नागनाथ पार, पुणें.

**नं. २० साबण** बार सोप आणि वडी वापरा — माणिक सोप वर्क्स, कराड ( जि. सातारा )

## विविध माहिती

**श्री. चांदोरकर ह्यांचें अभिनंदन**--श्री. रामचंद्र दामोदर चांदोरकर, चालक विजय ग्लास वर्क्स, माझगांव मुंबई नं १०, यांची १९४८ सालाकरितां अखिल भारतीय सेरॅमिक सोसायटीचे अध्यक्षपदावर निवड करण्यांत आली आहे. हिंदुस्थान सरकारच्या 'ग्लास पॅनेल' चे ते एक सभासद असून कांच धंद्यांतील एक तज्ज्ञ म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे. आम्ही श्री. चांदोरकरांचे मनः-पूर्वक अभिनंदन करतों.

**ब्रिटन–हॉलंड व्यापारी करार**—चालू वर्षांत ब्रिटन व हॉलंड ह्यांनीं ७ कोटी पौंड किंमतीच्या मालाची देवाण-घेवाण करण्याचा करार केला आहे. १९४७ सालापेक्षां ह्या देव-घेवीचे प्रमाण २०·५ टक्यांनीं अधिक आहे.

**पाकिस्तानच्या दोन भागांत दळणवळण**—पाकिस्तानचे अंदाजपत्रक सादर करतांना अर्थमंत्र्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, पाकिस्तानचें बाहेरच्या जगाशीं परस्पर दळणवळण व्हावें म्हणून कराचीला एक बिनतारीचें स्टेशन उघडण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें, कराची व चित्तगांव ह्यांच्यामध्येंही बिनतारीचें दळण-वळण करण्याची सोय करण्यांत आली आहे.

**हौसिंग सोसायट्यांना कर्ज**—सहकारी हौसिंग सोसाय-ट्यांना मुंबईत दर घरामागे ५ हजार रुपये आणि इतर ठिकाणीं दर घरामागें ४ हजार रुपये कर्ज मिळण्याची मर्यादा आहे असें मुंबई सरकारनें जाहीर केलें आहे.

**वसतिगृहांतून जातीय भेदभाव नको**—मद्रास सरकारनें प्रांतांतील शाळांना व कॉलेजांना अशी सूचना केली आहे कीं त्या संस्थांच्या वसतिगृहांतून जातीय भेदभावावर आधारलेल्या जेव-णाच्या निरनिराळया व्यवस्था असता कामा नयेत.

**वीज कंपनीला परवाना**–डहाणू पीपल्स कोऑपरेटिव्ह इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी लि. ह्या कंपनीला डहाणू व इतर दोन गावांना वीज पुरवण्याचा परवाना मुंबई सरकारनें दिला आहे.

**हिंदुस्थान जपान व्यापार**—हिंदुस्थान आणि जपान ह्यांच्या दरम्यान मालाच्या ऐनजिनसी देवघेवीचा एक करार लवकरच होणार आहे असें कळतें. जपान हिंदुस्थानला १,००,००० चात्या पुरविणार असून त्याच्या बदला ३०,००० टन दगडी कोळसा घेणार आहे. जपाननें प्रथम लोखंडाची मागणी केली होती परंतु नंतर हिंदुस्थानतर्फे विनंति करण्यांत आल्यावरून जपान कोळसा घेण्यास कबूल झाला. सूत काढण्याच्या चात्या तयार करून हिंदुस्थानांत येण्यास ११ महिने लागतील असें जपानी अधिका-ऱ्यांचें म्हणणें आहे.

**दिल्ली–मथुरा दुसरी रेल्वे लाइन**—दिल्ली आणि मथुरा ह्यांच्या दरम्यान रेल्वेची एकच लाइन आहे. वाहतुकींत होणारी वाढ लक्षांत घेऊन हिंदी सरकारनें जी. आय. पी. रेल्वेच्या ह्या लाइनजवळ दुसरी लाइन टाकण्याचें ठरविलें आहे. हिंदुस्थानची फाळणी होण्यापूर्वी उत्तर हिंदुस्थानांत जाणारा माल मुंबईहून कराचीला बोटीनें जात असे व नंतर नॉर्थ वेस्ट रेल्वेनें ठिकठिकाणीं रवाना होई. फाळणी नंतर हा मार्ग जवळ जवळ बंद झाल्यानें जमिनीवरील वाहतुकीवर फार ताण पडत आहे. दक्षिण हिंदु-स्थानकडून उत्तरेकडे जाणारी वाहतुक दिल्ली–मथुरा रस्त्यावर एकवटलेली आहे. दुसऱ्या लाइनला खर्च ६० लाख रु. येईल आणि ती ऑक्टोबर १९४९ मध्यें पुरी होईल असा अंदाज आहे.

## अमेरिकन कर्जाचा आधार ब्रिटनला उरला नाहीं.

१५ जुलै, १९४६ रोजीं अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला १४ अब्ज, १६ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें. १९५१ पर्यंत हें कर्ज ग्रेट ब्रिटनला पुरेल अशी अपेक्षा होती, परंतु गेल्या आठवड्यांत ब्रिट-ननें कर्जाचा शेवटचा हप्ता उचलून पांच वर्षांची तरतूद दीड वर्षांतच संपवून टाकली आहे. कर्जाचा विनियोग भांडवली माल, मशीन टूल्स, इत्यादि उत्पादनास सहायकारक जिनसा खरीदण्या-कडे केला पाहिजे, ह्याची ब्रिटिश सरकारास व जनतेस पूर्ण जाणीव होती. कालांतरानें ब्रिटिश निर्गत व्यापार पुरेसा वाढून आपल्या उत्पन्नांतून ब्रिटन कर्जफेड करूं शकेल अशी अपेक्षा कराराच्या मुळाशीं होती. पहिल्या महायुद्धांतील अमेरिकेचें कर्ज ब्रिटननें पूर्णतः फेडलें नव्हतें, तरी सुद्धां अमेरिकेनें हें कर्ज दिलें होतें. अमेरिकेची समृद्धी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या वाढीवर अवलं-बून आहे आणि त्यासाठीं व्यापारी बंधनांची ओडकाठी दूर होणें अमेरिकेस अगत्याचें वाटतें. अँग्लो–अमेरिकन कर्जविषयक करारानें तें साध्य होण्यास सहाय्य होईल, अशीच अमेरिकेची अपेक्षा होती.

ब्रिटननें कर्जाची रक्कम उधळेपणानें वापरली असें कोणीच म्हणणार नाहीं. अन्न व कच्चा माल ह्यांच्या किंमती वाढत गेल्या कारणानें निर्गत वाढवूनहि आयात मालाची किंमत देण्यास ती पुरी पडूं शकली नाहीं. ब्रिटिश लोकांनीं आपला रहाणीचा दर्जा कायम राखण्याचा प्रयत्न चालविला आहे, परंतु त्यांची आजवरची श्रीमंती लक्षांत घेतां त्यासहि मर्यादा आहेत. ग्रेट ब्रिटनच्या पर-राष्ट्रीय व्यापाराचा ताळेबंद वाढाव्याचा झाला नाहीं तर इंग्रजांवर आपत्ती आल्याविना रहाणार नाहीं; नव्हे ती आतांच ओढवली आहे.

अँग्लो–अमेरिकन कर्जानें ग्रेट ब्रिटनचें आर्थिक सामर्थ्य व परत-फेडीची शक्ती ह्यांत वाढ केलेली नाहीं आणि कर्जाच्या परत-फेडीचा आज विचारहि करण्याचें कारण उरलेलें नाहीं. सरकारा-सरकारांतील देण्याघेण्याचा इतिहास सांगतो, कीं धनको राष्ट्रांना आपल्या येण्यावर बहुतेक प्रसंगी पाणी सोडावेंच लागतें ! ऋणको राष्ट्राची परतफेडीची ऐपत राहिली असें मानलें तरी राजकीय किंवा इतर स्थित्यंतरांमुळें कर्जविषयक करार कागदावरच रहातात. गेल्या महायुद्धांत ग्रेटब्रिटन हिंदुस्थानचा ऋणको बनला परंतु निर्माण झालेलें आपलें येणें वसूल होण्यांत अनेक अडचणी उपस्थित होत आहेत. हें येणें अगदी कमी रकमेवर तोडणें क्रमप्राप्तच होईल, असें स्पष्ट दिसूं लागलें आहे.

वरील परिस्थिति लक्षांत घेतली म्हणजे हिंदुस्थान–पाकिस्तान आर्थिक कराराच्या भवितव्याबद्दलहि साशंकता वाटूं लागते. पाकिस्तानानें हिंदुस्थानाचें ४०० कोटी रुपयांचें कर्ज ५० वर्षांत सव्याज फेडावयाचें आहे आणि हप्त्यांस प्रारंभ १५ ऑगस्ट, १९५२ रोजीं व्हावयाचा आहे. म्हणजे, कांहीं काळ तरी पाकिस्तानवर कर्जफेडीची मुळींच जबाबदारी नाहीं. ५० वर्षांची परतफेडीची मुदत हीहि फार दीर्घ आहे. ह्या मुद्यांवर प्रस्तुत करारावर वेळींच टीका करण्यांत आली होती. अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमधील सलोख्याचे संबंध आणि हिंदुस्थान व पाकिस्तान ह्यांचेमधील तेढ ह्याहि गोष्टी ह्यासंबंधांत महत्त्वाच्या आहेत. आज हिंदुस्थानास पाकि-स्तानी आक्रमणास तोंड देण्यासाठीं मोठ्या प्रमाणावर लष्करी खर्च करावा लागत आहे. कर्जफेडीच्या कराराच्या अटींबाबत पुढें बाधा निर्माण होणार नाहीं आणि ५० वर्षें दरसाल आपणांस सव्याज कर्जफेड सतत होत राहील, ही अपेक्षा न ठेवलेलीच बरी.

# अर्थ

बुधवार, ता. १० मार्च १९४८




प्रो. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## तिसऱ्या महायुद्धाचा धोका

कॉगढन मतदार गटातर्फे ब्रिटिश कॉमन्स सभेत प्रतिनिधी निवडून देण्यासाठी निवडणूक होणार आहे, त्यांतील हुजूर पक्षाच्या सभासदास पाठिंबा देणारें मि. चर्चिल ह्यांचें पत्रक प्रसिद्ध झालें आहे. रशियाच्या साम्राज्यशाही प्रत्येक पावलागणिक तिसऱ्या महायुद्धाचा धोका नजीक येऊन ठेपत आहे, असें मि. चर्चिल ह्यांनीं स्पष्टपणें बजावलें आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेचें आजचें स्वरूप तिच्या मूळ उद्देशापेक्षा अगदीं वेगळें झालें आहे, अशी कबुली संघटनेचे सेक्रेटरी जनरल एम. ट्रिग्वेली ह्यांनीं दिली आहे. "संघटनेचीं सभासद–राष्ट्रें संघटना प्रभावी करण्यास आवश्यक तें करण्यांत कुचराई दाखवीत आहेत व महत्त्वाच्या आणि तातडीच्या प्रश्नांवर निश्चित उपाययोजना करण्याचें आपण टाळलें आहे" असें ते म्हणाले. अणु शक्तीवर नियंत्रण, संयुक्त राष्ट्रसंघटनेचा निर्णय अंमलांत आणण्यासाठी लष्करी दलांची उभारणी, शस्त्रसंन्यास, इत्यादि बाबतींत राष्ट्रसंघटना दुर्बळ ठरली आहे. एका बाजूस रशिया व दुसऱ्या बाजूस अमेरिका प्रभृति राष्ट्रें, असे जागतिक आखाड्यांत दोन पक्ष असून रशियाचें प्राबल्य व वर्चस्व वाढत चाललेलें आहे. पूर्व युरोपांत रशिया बलिष्ठ झाला असून चेकोस्लोव्हाकियांतील ताज्या अंतर्गत क्रांतीनें रशियाच्या दडपणाची तीव्रता स्पष्ट करून दाखविली आहे. ह्या घटनेमुळें युरोपांतील युद्ध काल जवळ आला आहे, अशी भीति रशियाविरोधी राष्ट्रें व्यक्त करीत आहेत. दुसऱ्या महायुद्धाचा अनुभव ताजा असलेल्या, युरोपांतील दुर्दैवी राष्ट्रांतील जनतेच्या मनःस्थितीची कल्पनाच केलेली बरी.

रशियास तोंड देण्यासाठी पश्चिम युरोपांतील लोकशाही राष्ट्रांचा गट तयार करण्याची योजना केव्हांच आखण्यांत आली होती, परंतु तिची प्रगति आजवर अत्यंत मंद गतीनें होत आहे; निदान प्रत्यक्ष व्यवहारांत ती प्रगति दिसून आली नाहीं. युरोपियन राष्ट्रांची आर्थिक स्थिति मात्र क्रांतीस पोषक अशीच होत चालली आहे. फ्रान्समधील परिस्थिति बिघडली तर क्रांति टाळणें फारच बिकट होईल. रशियाच्या पंखाखालीं युरोपांतील सर्व देश लवकरच जातील आणि इंग्लंड एकटें बाजूस पडेल, ह्या जाणीवेनें युरोपांतील राष्ट्रांना त्यांचे स्वतःचे पायांवर उभें करण्याचा इंग्लंडचा प्रयत्न अमेरिकेच्या पाठिंब्यानें चालू आहे. परंतु खुद्द इंग्लंडचीच स्थिति खालावत चालली आहे. एकट्या अमेरिकेनें सबंध युरोपची रशियाविरुद्ध उभारणी करूं शकणें अमेरिकेच्या प्रभावी सहाय्यावर आणि युरोपांतील अनुकूल मनोवृत्तीवर व उत्साहावर अवलंबून आहे.

रशिया—अमेरिकाप्रभृति देशांतील स्पर्धेचे पडसाद जगांतील सर्वच मान्याचे ठिकाणच्या प्रदेशांत उमटूं लागले आहेत व त्यांतील आणि ह्या तेढीचें जागतिक स्वरूप स्पष्ट होण्यास फार कालावधि लागणार नाहीं. हिंदुस्थान संभाव्य महायुद्धाच्या क्षेत्रापासून दूर आहे असें आज वाटत असलें तरी आपणांस गैरसावध राहून चालणार नाहीं. आपल्या देशाच्या चतुःसीमेंतील सर्व प्रदेश अद्याप मध्यवर्ती सरकारच्या नियंत्रणाखालीं आलेला नाहीं. देशांत शांततारक्षण करण्यासाठीं सरकारास बरीच शक्ती खर्चावी लागत आहे आणि काश्मीरच्या बचावाप्रीत्यर्थ तर प्रत्यक्ष युद्धच चालू आहे. मालक व कामगार ह्यांचेमधील तेढ वाढत आहे आणि त्यामुळें देशाच्या नागरिकांचा एकसंधीपणा निर्माण होण्यास अडचण निर्माण झाली आहे. देशापुढील बिकट आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रश्न पुरेसे कठीण आहेत आणि त्यांत एखाद्या महायुद्धाची भर पडली किंवा त्याची पडछाया जरी पडली तरी त्याचा ताण सोसून डोकें वर राखणें सर्व जनतेच्या हार्दिक सहकार्याशिवाय हिंदुस्थानास फार सोपें जाणार नाहीं. स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं फार दक्षतापूर्वक तयारी ठेवावी लागते परंतु ही तयारी पुरी होण्यापूर्वीच तिच्या परीक्षेची वेळ येणें हितावह होणार नाहीं. ह्या सर्व परिस्थितीची आपल्या सरकारास जाणीव आहे. जनतेनेंहि आत्यंतिक स्वार्थ बाजूस सारून व्यापक हितास प्राधान्य देण्याचा गुण अंगीकारला पाहिजे. प्रत्येक गोष्ट कायद्यावरच अवलंबून न ठेवतां आणि दुसऱ्याच्या अपकृत्याकडे लक्ष न देतां योग्य तो मार्ग पत्करला पाहिजे. स्वातंत्र्याचीं फळें चाखण्यास मिळावयास अद्याप तपश्चर्येची आवश्यकता आहे.

### शेतीच्या पाणी पुरवठ्याचे बाबतींत मुंबई सरकारचा मागासलेपणा.

"मुंबई प्रांतांत २८० लक्ष एकर जमीन लागवडीखालीं आहे. त्यापैकीं २१० लक्ष एकरांत अन्नधान्याची लागवड होते आणि त्यांत दरसाल ३७ लक्ष टन धान्य निघतें. मागणीपेक्षां उत्पादन ५ लक्ष टन कमी आहे. येत्या पांच वर्षांत अन्नधान्याच्या बाबतींत आपला प्रांत स्वयंपूर्ण होईल, अशी खात्री आहे. प्रांतांतील लागवडीस योग्य असलेल्या जमिनीपैकीं फक्त ४% जमिनीस पाटाचें पाणी मिळतें; सिंधमधील तत्सम प्रमाण १००% आहे. पंजाबांत तें प्रमाण ६०%, सरहद्द प्रांतांत ४३%, संयुक्त प्रांतांत २७%, मद्रासमध्यें २६%, आणि ओरिसा-बिहारमध्यें २२% आहे. शेतीस पाटाच्या पाण्याचा पुरवठा वाढविण्याचा शक्य तो प्रयत्न चालूं आहे.":– कृषिमंत्री, श्री. पाटील, ह्यां[illegible] विधिमंडळांत भाषण.

### मुंबई सरकारचें औद्योगिक धोरण

"मध्यवर्ती सरकारच्या योजना जाहीर झाल्या, कीं मुंबई सरकार आपलें औद्योगिक धोरण तात्काळ जाहीर करील. लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यास संरक्षण देण्याचा प्रश्न पुढें कदाचित् उपस्थित होईल. मोठे आणि मध्यम आकाराचे उद्योगधंदे ह्यांच्याच बरोबर ग्रामोद्योग ह्यांचाहि मेळ घालण्याबाबतहि योजना आखावी लागेल. ऑइल मिल्स स्थापण्यासाठीं कंपन्या काढण्यास मुंबई सरकार परवानगी देणार नाहीं, हें धोरण निश्चित ठरलें आहे. ऑइल मिलसच्या स्थापनेसाठीं यंत्रसामुग्री आयात करण्यास परवाने मिळणार नाहींत. घाणीच्या तेलास प्रोत्साहन मिळावें, असेंच सरकारचें धोरण राहील.":– अर्थमंत्री, श्री मेहता, ह्यांचा मुंबई विधिमंडळांत खुलासा.

## हिंदी साखरेच्या धंद्यापुढील निकडीचे प्रश्न

इंडियन सेंट्रल शुगरकेन कमिटीची नववी वार्षिक सभा दिल्ली येथें ता. २६ फेब्रुवारी रोजीं भरली होती. सभेचे अध्यक्ष सर दातारसिंग ह्यांनीं हिंदी साखरेच्या धंद्यापुढील निकडीच्या प्रश्नांचें, आपल्या अध्यक्षीय भाषणांत दिग्दर्शन केलें. हिंदी संघराज्यानें ऊंस आणि साखर किती उत्पन्न करावी ह्याबाबत पुन्हा निर्णय घेतला पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. देशाची फाळणी झाल्यानंतर अशा प्रकारचा निर्णय होणें अवश्य आहे असें प्रतिपादन करून ते पुढें म्हणाले, "१९४५-४६ सालांतील आंकडे लक्षांत घेतले तर ८,२५,९२१ टन अथवा ८७·४२ टक्के साखर हिंदी संघराज्याच्या प्रदेशांत निर्माण केली गेली. हिंदी संघराज्याला मिळणाऱ्या संस्थानांतून ३५,६०० टन साखर तयार झाली आणि पाकिस्तानांत २३,२७९ टन साखर तयार झाली. पण पाकिस्ताननें हिंदुस्थानपासून साखर घेण्याचें बंद करून परदेशांतील साखर आयात करण्यांत सुरवात केली तर हिंदुस्थानांतील शिलकी साखरेला बाजारपेठ शोधून काढावी लागेल.

"हिंदी साखरेच्या धंद्यापुढें फार मोठे प्रश्न उभे आहेत. त्यांचा आजच्या परिस्थितीच्या अनुरोधानें विचार व्हावयास हवा. साखरेच्या धंद्याला वाईट हवामान, उसाचा अपुरा पुरवठा, रेल्वेच्या वॅगन्सची टंचाई, इत्यादी अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. ऊंस होऊं शकणाऱ्या प्रदेशांत उंसाची लागवड वाढविण्यासंबंधीं पंचवार्षिक योजना तयार असून त्यासाठीं ७५ लाख रुपये मदत मिळाली आहे. सरकारची मंजुरी मिळाली म्हणजे त्या अमलांत आणण्यांत येतील. टॅरीफ बोर्डाच्या शिफारशीला अनुसरून हिंदी सरकारनें कमिटीच्या वार्षिक मदतींत वाढ करण्याचें कबूल केलें आहे. ११ ते १२ लाखांऐवजी ५० लाखांची मदत सरकारकडून लवकरच मिळेल अशी अपेक्षा आहे. ही मदत मिळाली तर उसाच्या पिकाबाबत नवीन संशोधन आणि नवीन योजना हाताशीं घेतां येतील, इतकेंच नव्हे तर संशोधनाचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करतां येईल. उंसाच्या लागवडीचें क्षेत्र वाढवून साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न होणें जरूर आहे. त्याचप्रमाणें उंसाचा दर्जा आणि त्याची दर एकरी निपज ह्यांच्यांत सुधारणा घडवून आणली पाहिजे. शिवाय, रोगाला दाद न देणाऱ्या उसाच्या जाती, अधिक प्रमाणांत साखर असणाऱ्या जाती, निरनिराळ्या ऋतूंत तयार होणाऱ्या उंसाच्या जाती, ह्यांची लागवड करणें जरूरीचें आहे. उस गाळून साखर करण्याचा हंगाम ११० ते १३० दिवस चालेल अशी व्यवस्था केली पाहिजे. त्यासाठी कारखान्यांना उंसाचा पुरवठा नीट झाला पाहिजे. उंस विकणाऱ्या शेतकऱ्याला किफायतशीर किंमत मिळाली पाहिजे. त्याचप्रमाणें उसाच्या पिकासाठीं खतें व पाणी ह्यांची योग्य सोय करण्यांत आली पाहिजे.

"साखरेच्या उत्पादनाची किंमत कमी करणें आणि चांगल्या दर्जाचा ऊंस जास्तींत जास्त लावणें ह्या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. साखरेच्या उत्पादनांतील ६० टक्के किंमत उंसाची असल्यामुळें साखरेच्या उत्पादनाची किंमत कमी करावयाची असेल तर जास्तींत जास्त प्रमाणांत साखर असलेला ऊंस अधिक लावणें हाच एक मार्ग आहे. त्यासाठीं संशोधन आणि संयोजन ह्यांची आवश्यकता आहे. हिंदी साखरेच्या कारखान्यांची कार्यक्षमता वाढत आहे. त्यांतून नव्या यंत्रसामुग्रीची जोड मिळाल्यावर तर ती अधिकच वाढेल. साखरेच्या कारखान्यांतून वाया जाणारी रसाची मळी आणि इतर आज कचऱ्यासारख्या वाटणाऱ्या वस्तू ह्यांचा दुय्यम धंद्यांसाठीं उपयोग करून घेतला पाहिजे. उदाहरणार्थ, पॉवर अल्कोहल, स्पिरिट, इत्यादींचे कारखाने काढण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. गेल्या दोन तीन वर्षांत धान्य पिकविण्याच्या मोहिमेवर जोर दिला गेल्यामुळें उंसाच्या लागवडींत घट झाली आहे. त्यामुळें साखरेच्या उत्पादनांतही घट झाली आहे. आज साखरेचें उत्पादन वाढविण्याची अत्यंत गरज आहे."

मुंबई साखर- व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. उजमशी ह्यांनीं असा अंदाज केला आहे की, हिंदुस्थानांतील साखरेच्या चढ्या किंमतींमुळें तिचा खप कमी होईल. पाकिस्तानला हिंदी सरकारनें १०,००० टन साखर दिली आहे. पण ह्यापुढें पाकिस्तानला अधिक साखर न देण्याचें सरकारनें ठरविलें असल्यानें आतां हिंदुस्थानांतून पाकिस्तानला साखर पाठवितां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील साखरेच्या किंमतींपेक्षां इतर देशांतील साखरेच्या किंमती बऱ्याच कमी आहेत. त्यामुळें पाकिस्तान परकीय देशांतून साखर आयात करण्याचा संभव आहे. शिवाय, परदेशांतून साखर आयात करण्यांत पाकिस्तानला आयातीवरील जकातही मिळेल. ह्या परिस्थितीचा विचार करतां बाजारांत साखर फार होऊन तिची किंमत घसरेल असा त्यांचा अंदाज आहे.

---

### बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेच्या प्रगतीचे खालील तुलनात्मक आकडे बोधप्रद वाटतील:—

आकडे लक्ष रुपयांचे आहेत

| | १९३९ | १९४५ | १९४७ |
|---|---|---|---|
| भांडवल | १०० | १४८ | १५० |
| रिझर्व्ह फंड | ११४ | १८९ | २१४ |
| ठेवी:— | | | |
| मुदती | ८१७ | १२१८ | १६५७ |
| चालू | १०४२ | ४६८३ | ५२०७ |
| एकूण | १,८५९ | ५,९०१ | ६,८६४ |
| कर्जे | ९९८ | २,०९८ | २,८७१ |
| रोख्यांत गुंतवण | ४९६ | ३,३३५ | २,९९१ |
| ट्रेझरी बिलें | २१४ | ...... | २७८ |
| रोख | ३७३ | ८२० | १,२२५ |
| ताळेबंदाची बेरीज | २,०९७ | ६,२८७ | ७,५४५ |

---

**सहकारी हौसिंग सोसायट्यांस कर्जे**—गृहमंडळ्यांस द्यावयाच्या कर्जाची मर्यादा, मुंबई शहरांत प्रत्येक बिऱ्हाडामागें ५,००० रु. व इतरत्र ४,००० रु. ठरविण्यांत आली आहे.

**सकाळ पेपर्स लि.**—डॉ. एन. बी. परुळेकर ह्यांनीं वरील खाजगी लिमिटेड कंपनी नोंदविली आहे. तिचें भांडवल २५ लक्ष रु. राहील.

**कोल्हापूर शुगर मिल्स लि.**—३० जून, १९४७ अखेरच्या वर्षी वरील कंपनीस ७८,९३३ रु. तोटा झाला, त्याचें प्रमुख कारण कंपनीच्या कारखान्यांतील दीर्घ काळ चाललेला संप, हें होय. उसास एक महिनाभर पाणी न मिळाल्याकारणानें, तो वाळला व त्यामुळें साखरेचा उतारा कमी पडला. ऊंसहि कमी मिळाल्यानें कमी ऊंस गाळला गेला. परंतु, खर्चाचा बोजा कायम राहिला आणि सहाजीकच उत्पादन खर्च वाढून तोटा आला. रिझर्व्ह फंडांतून भागीदारांस १२% करमाफ डिव्हिडंड देण्यांत आले. चालू मोसम समाधानकारक आहे.

## १९४७ सालामधील हिंदी विमा-व्यवसाय

### कांहीं ठळक घडामोडी

**आयुर्विमा**—१९४७ सालच्या प्रारंभीं, मध्यवर्ती कायदेमंडळानें विमा कायद्यांत दुरुस्ती सुचविण्यासाठी नेमलेल्या सिलेक्ट कमिटीच्या संभाव्य शिफारसीसंबंधीं चर्चा चालू होती. कमिटीच्या शिफारशींत दोन शिफारशी महत्त्वाच्या होत्या. पहिली विमानिधीच्या गुंतवणुकीसंबंधीं आणि दुसरी वट्ट खर्चावर बंधनें घालणारी. ह्या दोन्ही शिफारशीसंबंधानें बरीच प्रतिकूल टीका करण्यांत आली होती. पैसे गुंतविण्याच्या संबंधींच्या कलमांत, विमानिधीपैकीं ५५ टक्के रक्कम सरकारी अगर सरकारमान्य रोख्यांत गुंतविण्याचें बंधन घालण्यांत आलें होतेंच. पण शिवाय उरलेल्या ४५ टक्क्यासंबंधींही पूर्ण स्वातंत्र्य नव्हतें असें म्हणतात. आयुर्विमा कंपन्यांनीं पहिल्या वर्षाच्या हप्त्याच्या ८५ टक्क्यांपेक्षा अधिक खर्च करता कामा नये असें ठरविण्यांत आलें. फक्त नवीन कंपन्यांना थोड्या सवलती देण्यांत आल्या. हें बिल पावसाळी अधिवेशनांत मांडलें जाणार होतें; पण आतां तें अंदाज पत्रकाच्या अधिवेशनांत मांडलें जाईल. विमा कायद्याखालील नियमांत सुचविलेल्या कांहीं दुरुस्त्या प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या त्यांत विमेदारातर्फे डायरेक्टर म्हणून निवडून येण्यासाठी जे उमेदवार उभे रहातील त्यांना कंपन्यांनीं विमेदारांचीं नांवें व व पत्ते ह्यांची यादी पुरविली पाहिजे अशी एक दुरुस्ती सुचविण्यांत आली होती. ह्या दुरुस्ती विरुद्ध बरीच विरोधी टीका करण्यांत आली.

**पिकांचा विमा**—पूर्वींच्या मध्यवर्ती विधिमंडळांत पिकांचा विमा उतरण्याची योजना आखण्यासाठी एक बिनसरकारी ठराव आणला गेला होता. ह्या वेळचे अन्नमंत्री बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांनीं ह्या प्रश्नाबाबत लक्ष घालण्याचें आश्वासन दिल्यामुळें तो मागें घेण्यांत आला. नंतर इंडिअन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें गुरांचा विमा उतरण्यासाठी जरूर ती माहिती मिळवावी म्हणून विमागणिती व विमा तज्ज्ञ ह्यांची एक कमिटी नेमण्याचा विचार केला..

**सामाजिक विमा**—प्रो. आडारकर आणि आंतरराष्ट्रीय मजूर संस्थेचे डॉ. बोडमर यांनीं खलाशांना वैद्यकीय मदत देण्यासाठी एक बिल तयार केलें होतें. त्यावर मध्यवर्ती विधिमंडळांत चर्चा करण्यांत आली. दुसरें एक बिल कामगारांचा सरकारी विमा उतरण्यासंबंधींचें होतें. त्यावर नोव्हेंबरमध्यें चर्चा करण्यांत आली आणि तें सिलेक्ट कमिटीकडे सोपविण्यांत आलें. ह्या बिलांत एकंदर ८६ कलमें असून त्यांत कामगारांना आजारीपणांत, मृत्यूसंबंधीं आणि अपघातासंबंधीं मदत देण्याची व्यवस्था आहे.

**सरकारी नोकरांचा सक्तीचा विमा**—सेंट्रल पे कमिशनचा अहवाल मे महिन्यांत प्रसिद्ध झाला आणि तो सरकारनें मान्य केला. अहवालांत सरकारी नोकरांच्या सक्तीच्या विम्याची व्यवस्था केलेली आहे. ह्या योजनेमुळें सरकारी नोकरांना पेन्शन शिवाय विम्याचेंहि संरक्षण मिळाणार आहे. ह्या सक्तीच्या विम्याचे हप्ते सरकार देणार असून त्यामुळें सरकारच्या खर्चांत विशेष वाढ होणार नाहीं.

**दर्यावरील वहातुक-विमा**—हिंदुस्थान सरकार जो माल परदेशांतून आयात करील त्याचा विमा हिंदी कंपन्यांतच उतरण्याचा महत्त्वाचा निर्णय सरकारनें घेतला आहे. सर्व साधारण विम्याची वाढ आणि व्यापारांतील विम्याचें स्थान ह्यांच्या दृष्टीनें हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा आहे. हिंदुस्थान सरकारनें आयात केलेल्या ८-कोटी वार कापडाचा विमा इंडियन इन्शुरन्स असोसिएशनतर्फे उतरण्यांत आला. ह्या धंद्याला हिंदुस्थान सरकारनें अधिकृत मदत दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. स्वतंत्र्यप्राप्तीचेंच तें एक फळ आहे.

### "महाराष्ट्र" पुनर्घटना विशेषांक

नागपूरच्या "महाराष्ट्र"नें पुनर्घटना विशेषांक काढला आहे. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यापासून भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नानें पुन्हा तातडीचें स्वरूप धारण केलें आहे. महाराष्ट्राच्या ह्या अंकांत महाराष्ट्राच्या आर्थिक प्रश्नांचें स्वरूप पहावयासच सांपडते. अंकांत एक मात्र उणीव भासते; महाराष्ट्रासारख्या दरिद्री प्रांतावर युद्धकालीन चलनवाढीचें काय परिणाम झाले ह्याविषयीं एखादा लेख असावयास पाहिजे होता. पुनर्घटना अंकांत एखादी गोष्ट कमी आली असती तर चालण्यासारखे होते. तथापि, महाराष्ट्राच्या आर्थिक उत्कर्षाला वाट दाखविणारा एक वाटाड्या म्हणून अंक उपयुक्त आहे.

ग. रा. जो.


**THE MYSORE GLASS & ENAMEL WORKS LTD. BANGALORE.**

# NOTICE

The 9th Annual General Meeting of the Shareholders of the Company will be held on Sunday the 11th April 1948 at 5 P. M. at the Company's Glass Works near Yesvantapur Railway Station, to transact the following business:

1. To Receive and adopt the Directors' Report, Audited balance Sheet and Profit and Loss account for the period ended 31st December 1947.
2. To Declare a Dividend.
3. To elect two Directors in the place of the retiring Directors, who retire by notation according to article 112 of the A. of A. of the Company and are eligible for re-election and offer themselves accordingly.
4. To appoint Auditors for the current year and fix their remuneration.
5. To Consider the extension of the Managing Agency for a further period according to Section 87 of the Mysore Companies Act.

By order of the Board,
For the Ogale Glass Works Ltd.,
**Shankar Rao P. Ogale**
Managing Agents.

34, Gandhi Nagar,
Bangalore City,
28 February 1948.

*N. B.* The Share Transfer Books of the Company will be closed from 30th March 1948 to 12th April 1948 (both days inclusive).

The Dividend on Shares, as recommended by the Directors, if passed at the General Meeting, will be paid on and after 1st of June 1948. The Dividend Warrants will be posted to those Shareholders whose names stand on the Share Register on the 30th March 1948.

## हिंद सरकारच्या बजेटबद्दल कांहीं विचार

( भा. म. का. )

हिंद-सरकारचें अंदाजपत्रक जमा खर्चाच्या आंकड्यांची तोंड-मिळवणी साधल्यामुळें दिलासायास समाधानकारक वाटतें. पुढील वर्षी अर्थ-मंत्र्यांना रु. १५० कोटी कर्ज उभारण्याचा विश्वास आहे ही गोष्टहि समाधानकारक वाटते. विशेषत: कारखानदार व लहान व्यापारी कंपन्या ह्यांना नि निराळ्या प्रकारांनीं कर-पद्धतींत पुढील वर्षी सूट देण्यांत आल्यामुळें, हा व्यापारी व उत्पादनाचे कार्यास मदत करणारा वर्ग थोडासा समाधानी झाला आहे. गेल्या वर्षीच्या बजेटांतील कर-पद्धतीनें ह्या वर्गाला जोराचा धक्का बसला होता, परंतु आतां एका वर्षानंतर स्वातंत्र्य, फाळणी, इतर बदलणारी परिस्थिति ह्या सर्वांचा परिणाम म्हणून कारखानदार वर्गावरील कराचा बोजा थोडासा हलका करणें प्राप्त झालें आहे, व यामुळें उत्पादनाला व नवीन भांडवल गुंतवण्याला चालना मिळणार आहे. म्युनिसिपल टॅक्सची रक्कम शहरांतील घरमालकांना आतां प्राप्ती-वरील कराला लागू होणार नाहीं ही यंदाची नवीन सुधारणा मोठाल्या शहरांतील घरमालकांना खूष करील.

परंतु यंदाच्या बजेटनें सामान्य माणसावर थोडासा बोजा लादला आहे हें मान्य करावें लागेल. चहा, कॉफी, सिगारेट्स, तंबाखू, वनस्पती तूप, आगपेट्या, पोस्टाचे रजिस्ट्रेशन फींत वाढ ह्या सर्व योजना मध्यम व गरीब जनतेला सहन कराव्या लागतील. फक्त सुपारीवरील जकात रद्द झाल्यामुळें थोडी सवलत मिळाली आहे. निर्यात व्यापाराच्या दृष्टीनें गळिताचीं धान्यें व वनस्पती तूप यावरील निर्गत जकात फायदेशीर ठरेल किंवा नाहीं हें अंतर्गत उत्पादन व जागतिक मागणी यांच्या समन्वयावर अवलंबून राहणार आहे, यामुळें व्यापारी वर्गाची या जकातीविरुद्ध तक्रार रहाणार असें दिसतें. फक्त मँगेनीजला निश्चित प्रमाणांत मागणी असल्यामुळें त्यावरील जकात योग्य आहे. मोटारीवरील आयात जकातीची वाढ केवळ श्रीमंतानाच सोसावी लागणार असे नव्हे, तर सामान्य जनतेला मोटारीच्या दळणवळणाचा दिवसेंदिवस जास्त प्रमाणांत उपयोग करावा लागत असल्यामुळें त्याहि वर्गावर कांहीं बोजा बसणार असें वाटतें.

यंदा बजेटची तोंडमिळवणी थोड्या फार कर-वाढीनें व कर-सवलतीनें शक्य झाली हें खरें असलें तरी यापुढें बिझिनेस प्रॉफिट टॅक्स व एक्सेस प्रॉफिट टॅक्स यांच्या उत्पन्नांत घट येईल व त्यामुळें १९४९-५० सालीं हिंद सरकारचें उत्पन्न रु. २० कोटींनीं घटेल असा अर्थ-मंत्र्यांचा अंदाज आहे. तेव्हां यापुढील काळांत ही संभाव्य घट भरून निघावयाची तर इतर करांचें उत्पन्न साहजिक रीतीनें तरी वाढलें पाहिजे किंवा सरकारी खर्च कमी झाला पाहिजे. श्री. कस्तुरभाई लालभाई यांच्या अध्यक्षत्वाखालीं नेमलेल्या काटकसर कमिटीला अनुलक्षून यंदा खर्चांत सुमारें रु. २॥ कोटींची काटकसर करण्यांत येणार आहे. परंतु यापुढें राष्ट्र-वर्धिष्णु खात्यांवर सरकारला जास्त खर्च करावा लागेल हें लक्षांत घेतां प्रत्यक्ष काटकसर किती साध्य होईल हें अजमावणें कठीण आहे. लष्कर व संरक्षण यासाठीहि खर्च कांहीं प्रमाणांत वाढत जाईल. शिवाय या खात्यांसाठी स्वतंत्र भांडवली खर्चहि यापुढें जास्त करावा लागेल. विशेषत: जल-संरक्षण व हवाई-संरक्षण या बाबींवरील खर्च वाढणार असें दिसतें.

पुढील वर्षी पुनर्घटनेच्या योजनांना प्रांतांना रु. ३० कोटी दिले जाणार आहेत. हा खर्च तूर्त कांहीं वर्षे तरी चालूच रहाणार आहे. ह्या व्यतिरिक्त खुद्द मध्यवर्ती सरकारचाहि पुनर्घटनेच्या योजनां-वरील खर्च दर वर्षी वाढत जाणार. धान्याच्या आयातीकरतां १९४५ पासून सरकारला खर्च करावा लागत असून या खर्चाची रक्कम दरवर्षी फुगत चालली आहे. १९४५ ते ४८ ह्या वर्षांच याबद्दलचे आंकडे अनुक्रमें रु. १४, रु. २४, रु. ८९ व रु. ११० कोटी याप्रमाणें आहेत. अर्थात, अंतर्गत धान्याचें उत्पादन वाढल्यास, याबद्दलचा खर्च कमी होणार आहे व स्वस्त धान्य पुरविण्याची जबाबदारी सरकार जितक्या प्रमाणांत ढिली करील तितक्या प्रमाणांत हा खर्च कमी होईल. निर्वासितांच्या सोईसाठी होणारा खर्च पुढील काळांत असणार नाहीं व यामुळें खर्चाची परिस्थिति सुधारणें शक्य आहे. अर्थ-मंत्र्यांच्या भाषणावरून हिंदु-स्थानच्या निर्गत व्यापाराची असमाधानकारक परिस्थिति लक्षांत येते. आपल्या परराष्ट्रीय व्यापारांत १९४६ पासून प्रतिकूल तफावत दिसून येते व ही स्थिति प्रत्येक वर्षी जास्त बिकट होत चालली आहे. जानेवारी ते जून १९४८ या सहा महिन्यांचीच प्रतिकूल तफावत रु. ५२ कोटी होणार आहे. चालू सालीं स्टर्लिंग बॅलन्स-मधून मिळणाऱ्या रकमेंतून व आंतरराष्ट्रीय चलन निधींतून कर्ज काढून या तफावतीला कसेंबसें तोंड देतां येईल. परंतु व्यापाराची परिस्थिति एकंदरींत असमाधानकारक नाहीं. यासाठी अंतर्गत सर्व तऱ्हेचें उत्पादन वाढविलें पाहिजे अशी घोषणा अर्थमंत्र्यांनीं केली आहे. उत्पादन-वाढीबरोबरच सर चुनिलाल मेहता ह्यांनीं व्यक्त केल्याप्रमाणें, शक्य त्या बाबतींत आपली निर्गत वाढविण्याची मोहीम इंग्लंडप्रमाणें आपण सुरू करणें फायदेशीर ठरेल. अर्थात उत्पादन योग्य प्रमाणांत वाढल्याशिवाय निर्गतीची मोहीम यशस्वी होणार नाहीं. सारांश, वाढतें उत्पादन व वाढती निर्यात असें हें चक्र आहे.

सध्यांच्या परिस्थितींत आपल्या परराष्ट्रीय व्यापाराची तोंड-मिळवणी जितक्या लौकर साधणें शक्य होईल तितक्या लौकर ती साधण्याचा सरकारनें प्रयत्न करणें आवश्यक आहे. कारण, व्यापाराच्या समतोल परिस्थितीवरच हिंद सरकारची अर्थव्यवस्था अवलंबून आहे.

वाढत्या महागाईकडे सरकारचें लक्ष गेलें आहे, परंतु अजूनहि त्यावर निश्चित उपाययोजना आखलेली दिसत नाहीं. कमी खर्च करणें, सरकारला कर्ज देणें हे सर्व जुनेच उपाय आहेत. अर्थ मंत्री महागाई दूर करण्याचा एखादा निश्चित मार्ग सुचवूं शकतील अशी अपेक्षा होती.

---

### सायनोश्यूर कमर्शिअल कॉर्पोरेशन लि., बेळगांव

वरील कंपनीची स्टॅच्युटरी सभा रविवार, ता. २१ मार्च रोजीं भरणार आहे. प्रत्येकी १० रुपयाचा असे ८,०२४ भाग खपून ५८,२१५ रु. रोख वसूल झालेले आहेत. प्राथमिक खर्चाकरितां प्रॉस्पेक्टसमध्यें ५,००० रुपयांची तरतूद असूनहि सदरहू खातीं २,६८२ रु. च खर्ची पडलेले आहेत. कंपनीनें आपल्या उद्देशास अनुसरून बेळगांव येथें एक ऑइल मिल येत्या मोसमापासून सुरू करण्याचें ठरविलें आहे, आणि त्यासाठी माशिनरी गोळा केली आहे. त्याखेरीज खानापूर येथें जळाऊ विटांचा कारखाना कंपनी काढणार आहे, त्यास लागणारें साहित्य व तज्ञ सल्लागार ह्यांची जुळवाजुळव झाली आहे. श्री. शंकर चन्नाप्पा हत्तरकी, एम. एल. ए., कोल्हापूर, हे कंपनीचे चेअरमन असून टी. व्ही. कुलकर्णी आणि सन्सकडे मॅनेजिंग एजन्सी आहे. कंपनीची प्रगति अशीच शीघ्र होवो, असें आम्हीं इच्छितों.

---

सायनोश्यूर या इंग्रजी शब्दाचा अर्थ मार्गदर्शक ध्रुव तारा, असा आहे.

## शेअरबाजार

( श्री. व. वि. लोणकर, पुणें ५ )


झाडून साऱ्या प्रसिद्ध उद्योगपतींनीं श्री. षणमुखम् चेट्टींच्या अंदाजपत्रकाचें स्वागत केलें असतां शेअर बाजार मात्र ढासळलेला पाहून सामान्य गुंतविणारा आणि सटोडिया चकित होऊन गेला असून विस्मयानें पडत्या भावांकडे पहात राहिला आहे. यांत सुख एवढेंच कीं त्याच्याबरोबर अर्थमंत्री स्वतःही त्याच 'नावेंत' आहेत. अंदाजपत्रकानंतरच्या विधिमंडळी चर्चेच्या वेळीं आपल्याला वाटणारें आश्चर्य व्यक्त करून मुंबई–कलकत्त्याच्या चलाख सटोडियांना त्यांनी स्पष्ट शब्दांत चपकावण्यास कमी केलें नाहीं ही समाधानाची गोष्ट होय. अर्थमंत्र्यांनीं सरळ सांगितलें कीं माझ्याकडून मी गुंतविणारा वर्ग व उद्योगपती यांच्यावरील कराचें ओझें कमी करत असतां हे शेअर बाजारवाले भाव पाडीत आहेत. याचा अर्थ मी असा समजतों कीं मला भिवबून माझ्याकडून आणखी सवलती उपटण्याचा हा त्यांचा डाव आहे हें मी ओळखलें आहे. पण मी कांहीं कच्च्या गुरूचा चेला नाहीं. तुमच्या नुसत्या भाव पाडण्यानें सवलती काढण्याचा तुमचा उद्देश सफल होणार नाहीं. या पत्रकांत दिलेल्या सवलती जमेस धरून तुम्हीं उत्पादन काय वाढवून दाखवता तें मी पाहीन आणि जर पुढील वर्षीं मी येथें असलों तर काय आणखी सवलती पुढें द्यायच्या न द्यायच्या तें ठरवीन. ज्यांना किंमत आहे अशांचीं मतें व खुद्द अर्थमंत्र्यांचें भाषण हीं जर खरीं असतील, आणि तीं खोटीं असलीं तर त्यांनीं राजीनामे देऊन मोकळे होण्यास कांहींच हरकत नाहीं, तर बाजारभाव पडण्याचें थांबलें पाहिजे. अंदाजपत्रक अपेक्षेइतकें चांगलें आलें नाहीं या एकाच मुद्यावर पंधरा टक्के भाव पडावेत. इतकें का तें टाकाऊ आहे, असा प्रश्न येतो. जरा निराशा झाली असेल तर तेवढ्याकरता १९०० चा डिफर्ड १८५० पर्यंत उतरावा, पण तो १६५० पर्यंत कोसळतो या घटनेंत कांहीं तरी काळेबेरें आहे खास. अर्थमंत्री म्हणाले त्याप्रमाणें उगाच अवाच्या सवा अंदाज बांधावेत कशाला आणि अंगाबाहेर धंदा करावा कशाला? केला तर भाव पडले यांत नवल नाहीं. पण आतांपर्यंत २०० रु. नीं भाव पडल्यावर आणखी सुद्धां ते निश्चित पडणार आणि डिफर्ड लवकरच १५०० चा भाव पहाणार आणि पुढच्या सालीं ८०० चा भाव करून दाखवणार म्हणून भाकितं आणि वल्गना सुरू झाल्या आहेत.

सध्याचा पडलेला बाजार केवळ निराशाजनक बजेट येवढ्यावरच पडला असेल तर तो बाजवीपेक्षा जास्त घटला आहे हें निश्चित. त्यांत घाबरट आणि आधाशी तेजीवाल्यांची कापाकापी आणि त्यांच्या डोक्यावर संधीसाधू मंदीवाल्यांचे प्रहार यांची भर पडल्यानें बाजारांत विनाकारण भयंकर मंदी व पळापळ झाली आहे. बाजारगप्पांना ऊत आला आहे. मधेंच कोणी शकल काढली कीं सरकारनें बँकांना शेअरतारणावर कर्जें देऊं नयेत म्हणून हुकूम काढला आहे. आम्हीं एका शेड्यूल्ड बँकेला या बाबत विचारता, असली कसलीही हालचाल झाल्याची अथवा रिझर्व्ह बँकेनें हुकूम, पत्र वगैरे काढल्याची आम्हांला माहिती नाहीं असें स्पष्ट सांगितलें तेव्हां लिहिण्याचा मतलब असा, कीं बाजार आणखी खालीं जाऊं नये. पण मजा अशी आहे कीं विचारवंताच्या अकलेचा शेअर बाजारांत नेहमीच लिलांव होत असतो आणि मोठाल्या सटोडियांना जें सोयीस्कर तें घडविलें जातें. आमचें स्पष्ट म्हणणें आहे कीं मागील दोन वर्षें जितक्या वाईट म्हणून घटना घडावयाच्या तितक्या घडून बाजाराला आज ही स्थिति आलेली आहे. आणखी वाईट व्हावयाचें आम्हांस तरी दिसत नाहीं. या उपर ज्यांना हिंमत असेल ते जास्त हुशार आहेत; त्यांनीं खुशाल १६५० ला डिफर्ड मध्यें मंदी करावी. बाकीच्यांनीं हातांतला माल सोडूं नये आणि मुकाट्यानें बसावें असा सल्ला द्यावासा वाटतो.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



अधिक धान्य पिकविण्याची योजना
—यशस्वी होण्यास—
किर्लोस्कर पंपिंग सेट्स
हें अमोघ साधन आहे.
त्याचें सहाय घ्या !
किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

### महागाई कशी वाढत आहे ?

| | ऑगस्ट १९३९ अखेरचें वर्ष | २५–१–१९४७ | २०–१२–१९४७ | १०–१–१९४८ | २४–१–१९४८ |
|---|---|---|---|---|---|
| खाद्य पदार्थ | १०० | २९०·४ | ३३५·९ | ३५४६ | ३५०·५ |
| औद्योगिक कच्चा माल | १०० | ३४८·१ | ३९९·७ | ४०१·७ | ४०८·४ |
| अर्धा–पक्का तयार माल | १०० | २४०.६ | २६५·४ | २६३·० | २८३·१ |
| पक्का माल | १०० | २७२·४ | २८४·४ | २८७·३ | २९९·५ |
| इतर माल | १०० | ४८३·५ | ४५३·५ | ४६९·८ | ४४५·४ |
| सर्व प्रकारचा माल | १०० | २९०·९ | ३२०·२ | ३२७·८ | ३३४·७ |

ऑगस्ट, १९३९ अखेरच्या वर्षी वेगवेगळ्या मालाची घाऊक किंमत १०० धरली, तर ती किंमत कसकशी वाढत गेली, हें वरील तक्ता दर्शवितो. उदाहरणार्थ, खाद्य पदार्थांची घाऊक किंमत ऑगस्ट १९३९ अखेरच्या वर्षाच्या मानानें आतां ३½ पट झालेली आहे. जानेवारी १९४५ पुरतें पाहिलें, तर डाळी व गूळ ह्यांची किंमत उतरल्यामुळें किंमत-वाढीची प्रवृत्ति मर्यादित राहिली आहे. कच्ची कपास व लाख ह्यांची किंमत वाढली, त्यामुळें औद्योगिक कच्च्या मालाचा निर्देशांक चढला आहे. नियंत्रण दूर झाल्यामुळें सुताची किंमत २०% वाढली आणि बंगालमधील व्यापाऱ्यांच्या निकडीच्या मागणीमुळें मध्य प्रांतांतील लाकडाच्या किंमती कडाडल्या. त्याचें प्रतिबिंब "अर्ध-पक्का तयार माला" च्या चढलेल्या निर्देशांकांत आढळतें. कापडाच्या वाढलेल्या किंमतीचा परिणाम पक्क्या मालाच्या निर्देशांकावर झाला आहे.

**स्पेन्सर आणि कं. लि.**—खाद्य पदार्थ पुरवणाऱ्या हिंदुस्थानांतील सुप्रसिद्ध स्पेन्सर आणि कं. लि. नें गेल्या वर्षी ४ कोटी रुपयांची विक्री करून १२½ लक्ष रुपये निवळ नफा मिळविला आणि १०% डिव्हिडंड दिलें. कंपनीच्या मालकीचीं कित्येक हॉटेल्स व स्टोर्स आहेत आणि तिचा तंबाखूचाहि एक कारखाना आहे.

**लघुलेखकांत स्त्रियांचें प्राबल्य**—अमेरिकेंत लघुलेखक, टंकलेखक, इत्यादि कचेऱ्यांत कामें करणाऱ्या १५ लक्ष नोकरां पैकीं ९५% स्त्रिया आहेत. १५ लाखांपैकीं निम्म्यापेक्षा जास्त नोकरांना दरमहा ५२० रु. पगार मिळतो. लघुलेखकांस आठवड्यांत पांच दिवसांत मिळून ४० तास काम पडतें. निम्म्यापेक्षा जास्त नोकर तीस वर्षांपेक्षा लहान असून प्रत्येक चारांपैकीं एकच विवाहित आहे.

**स्वराज्यांतील नवीं तिकिटें**—हिंदी स्वराज्याच्या नव्या तिकिटांचे नमुने ठरविण्यासाठीं जी चढाओढ लावण्यांत आली होती, तींत एकूण १,७५० उमेदवारांनीं भाग घेतला होता. ह्या चढाओढीचा निकाल नुकताच लागून परीक्षकांनीं १५ नमुन्यांना बक्षिसास पात्र ठरविलें. आलेल्या नमुन्यांचें परीक्षण करून निर्णय देण्यासाठीं पांच परीक्षकांचें एक मंडळ नेमण्यांत आलें होतें.

**हिंदी बनावटीची पहिली बोट**—शिंदिया नॅव्हिगेशन कंपनीच्या बोटी बांधण्याच्या विझगापट्टम् येथील गोदींत ८,००० टनांचें एक जहाज बांधण्यांत आलें आहे. ह्या जहाजाला ४५ लाख रुपये खर्च आला. हिंदी कंपनीनें बांधलेलें तें पहिलेंच जहाज असून त्याचा जलतरणसमारंभ पं. नेहरू ह्यांच्या हस्तें ता. १४ मार्च रोजीं होणार असल्याचें समजतें.


नवीन पुष्कळ निघाले, तरी

**तुळजाराम मोदी, सातारा**

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

—महाराष्ट्रांतील—

प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

**दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २**

*—आमचीं वैशिष्ट्यें—*

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठीं लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

**दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड**

हेड ऑफिसः—टालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ, विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत ग. विठ्ठल हरि चवें यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.